


ठाणे : राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालयात 'कोकेडामा' या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती.

# वनशक्ती संस्थेतर्फे 'कोकेडामा' कार्यशाळा

ठाणे (बातमीदार) : वनशक्ती या सामाजिक संस्थेतर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, रबाळे येथे 'कोकेडामा' या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. ही कार्यशाळा विनामूल्य असून एकूण ७० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग दर्शवला. वनशक्तीच्या प्रकल्प अधिकारी चित्रा म्हस्के यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. गरीब माणसाचे बोन्साय म्हणून प्रचलित असणारे 'कोकेडामा' हे जपानी बागकामाचे तंत्र आहे. त्यामध्ये वनस्पतींच्या लागवडीसाठी कोणतेही भांडे वापरले जात नाही. या सत्रात कोकेडामा बनवण्यासाठी माती कशा प्रकारे बनवावी, त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या वनस्पती - त्यांची निवड, कोकेडामा कसा बनवावा आणि त्यांचे प्रकार, कोकेडामाची काळजी कशी घ्यावी आणि त्यांना पाणी देण्याचे तंत्र या विषयावर मार्गदर्शन केले. मुंबई ठाण्यासारख्या शहरांत जागेअभावी वनस्पती लागवड करणे अवघड जाते, अशा वेळी कोकेडामा हि पद्धत अत्यंत उपयोगी आहे, कोकेडामाचा वापर करून आपण घर, ऑफिस, खिडकी, बाग शोभिवंत करू शकतो असे मत वनस्पतीशास्त्र अभ्यासक चित्रा म्हस्के यांनी व्यक्त केले.

Mumbai, Thane-Today
13/12/2023 Page No. 2